पुण्य नगरी
गुरुवार, २९ जानेवारी २०२६

# विवेकानंद कॉलेजमध्ये उद्या युवा साहित्य संमेलन

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयातील वाङ्मय मंडळाच्या माध्यमातून युवकांच्या साहित्यप्रज्ञेचा शोध घेण्यासाठी तसेच नवोदित लेखक, कवींना त्यांच्या सर्जनशीलतेसाठी मुक्त व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथील वाङ्मय मंडळ व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दि. ३० जानेवारी रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत पाचव्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. संमेलनाचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांच्या हस्ते होणार आहे.

पुढारी गुरुवार, २९ जानेवारी २०२६

# 'विवेकानंद'मध्ये उद्या युवा साहित्य संमेलनाचे आयोजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विवेकानंद महाविद्यालय वाङ्मय मंडळ व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षच्या वतीने शुक्रवारी (दि. ३०) सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीत पाचव्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलनाचे आयोजन केले आहे.

संमेलनाचे उद्घाटन डॉ. रणधीर शिंदे यांच्या हस्ते व श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यावेळी संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, डॉ. श्रुती जोशी प्रमुख उपस्थित राहणार आहेत.